महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १८० वे | दिनांक : २५/०६/२०२६ | वार : गुरुवार

## हॉटेल्समध्ये ग्राहकांना मोफत शुद्ध पाणी देणे बंधनकारक : तुकाराम मुंढे



**मुंबई :** राज्यातील नागरिकांना दर्जेदार आणि सुरक्षित अन्न मिळावे, या उद्देशाने अन्न व औषध प्रशासन विभागाकडून सध्या 'सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र' ही विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सर्व अन्न व्यावसायिकांना कडक शब्दांत इशारा दिला आहे. राज्यातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, धाबे, खानावळी आणि ज्या-ज्या ठिकाणी अन्नप्रक्रिया केली जाते, अशा सर्व आस्थापनांनी अन्नसुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही आणि त्यांना कुणीही वाचवू शकणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

अन्नसुरक्षेसोबतच ग्राहकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मुंढे यांनी गांभीर्याने घेतला आहे. प्रत्येक हॉटेल आणि रेस्टॉरंटने ग्राहकांना पिण्यायोग्य आणि सुरक्षित पाणी मोफत उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे. तसेच, ग्राहकांना माहिती व्हावी यासाठी 'येथे पिण्याचे शुद्ध पाणी मोफत मिळेल' अशा आशयाचा फलक दर्शनी भागात लावण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत. या सर्व नियमांची आणि सूचनांची योग्य अंमलबजावणी न करणाऱ्या आस्थापनांवर प्रशासनाकडून धडक कारवाई करण्यात येईल, असा सक्त इशाराही तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

तुकाराम मुंढे पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले की, "अन्नात कुठेही भेसळ होऊ नये यासाठी काही पावले उचलण्यात येतात, त्याची जबाबदारी राज्याच्या एफडीए आयुक्तांवर असते. 23 जून रोजी एक आदेश काढण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि इटरिज यांनी नियम पाळणे बंधनकारक असेल. अन्न व सुरक्षा मानके यानुसार त्यांनी रजिस्ट्रेशन करावं. अन्न उत्पादन मानके, 2011 याच्यासह अनेक नियमांची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. तसेच शाळेच्या मुलांच्या सुरक्षेसाठी नियमांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे."

राज्यात सध्या सुरू असलेल्या 'सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत प्रशासनाने केलेल्या तपासण्यांमध्ये अन्नसुरक्षेबाबत अनेक गंभीर त्रुटी उघडकीस आल्या आहेत. या मोहिमेदरम्यान आस्थापनांमध्ये अत्यंत अस्वच्छ आणि अपायकारक परिस्थितीत अन्न शिजवणे, खाद्यपदार्थ बनवण्यासाठी एकदा वापरलेल्या तेलाचाच पुन्हा वापर करणे आणि अन्नपदार्थांसाठी अत्यंत निकृष्ट दर्जाचे पॅकेजिंग वापरणे अशा आरोग्यास घातक ठरणाऱ्या अनेक धक्कादायक बाबी निदर्शनास आल्या आहेत.

## वारकऱ्यांच्या सेवेसाठी राज्य सरकार कटिबद्ध : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** आषाढी वारी ही वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा महत्वपूर्ण सोहळा आहे. यंदाच्या वारीत लाखो भाविकांची कोणतीही गैरसोय होणारं नाही यासाठी सर्व विभागांच्या समन्वयातून व्यापक नियोजन करण्यात यावे. वारीचा उपक्रम डिस्कव्हरी व जिओग्राफी दूरचित्रवाहिनीद्वारे जगभरात पोहोचणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पूर्वतयारीबाबत आढावा बैठक झाली, त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पालखी सोहळा प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मागील वर्षी निर्मलवारी उपक्रम प्रभावीपणे राबविला असून यंदाचीही वारी सर्वांच्या सहकार्याने आणि पांडुरंगाच्या आशिर्वादाने यशस्वीपणे पार पडेल असे नियोजन करावे. यंदाच्या वारीसाठी पालखी मार्गावरील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती आणि मजबुतीकरण करण्यात आले. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे पालखी मार्गावरील प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळी मोठ्या प्रमाणावर जर्मन हँगर उभारण्यात आले असून संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज तसेच इतर पालख्यांच्या मुक्कामस्थळी जर्मन हँगरची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे लाखो वारकऱ्यांना सुरक्षित आणि प्रशस्त निवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

पुणे विभागाबाहेरील पालख्यांनाही सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी सोलापूर जिल्ह्यांचे पालकमंत्री यांची नोडल पालकमंत्री व पुणे विभागीय आयुक्त यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. डीजे मुक्त वारी सोहळ्यासाठी पोलीस प्रशासनाने सर्वांशी चर्चा करून प्रयत्न करावेत. वारी सोहळा हा पारंपरिक पद्धतीनेच साजरा करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

पालखी सोहळा प्रमुखांनी केलेल्या मागण्याचा सकारात्मक विचार केला जाईल असे ही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले. "आषाढी वारी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा आत्मा आहे. लाखो वारकरी भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा द्याव्यात. यंदाची वारी अधिक सुरक्षित, सुकर आणि संस्मरणीय करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, पालखी सोहळा प्रमुखांनी ज्या ज्या मागण्या केल्या होत्या त्याप्रमाणे पालखी सोहळ्यातील सर्व कामे पूर्ण केली आहेत. महिलांसाठी रात्रीच्या मुक्कामाची विशेष सुरक्षितता घेतली आहे. वारकरी आणि भक्तांची काळजी घेत हा सोहळा चांगल्या प्रकारे साजरा करण्याचे आवाहनही यावेळी उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी केले.

ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, पालखी मार्गावर वारकरी आणि भक्तांसाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.पालखी सोहळ्यात वारक-यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली आहे.

## पावसाळी अधिवेशनाचा तिसरा दिवस गाजला; वीजदर आणि धर्मांतर प्रकरणावर चर्चा

**मुंबई :** विधान परिषदेत वीजदर, स्मार्ट मीटर, सौर ऊर्जा आणि खंडित वीजपुरवठ्याच्या समस्यांवरून काँग्रेस आमदार सतेज (बंटी) पाटील आणि भाई जगताप यांनी राज्य सरकारला धारेवर धरले. विरोधकांच्या या प्रश्नांना उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आकडेवारीसह सडेतोड उत्तर दिले. "पुढील दोन वर्षांत राज्याचे वीजदर गुजरातपेक्षाही कमी होतील आणि २०२९-३० पर्यंत महाराष्ट्र हे देशातील सर्वात कमी वीजदर असलेले राज्य बनेल," अशी महत्त्वपूर्ण ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली. तसेच, वीज वितरण यंत्रणेतील त्रुटी दूर करण्यासाठी राज्यात 'आरडीएसएस' (RDSS) योजनेअंतर्गत २५ हजार कोटी रुपयांची कामे सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली.

चर्चेची सुरुवात करताना आमदार सतेज पाटील यांनी राज्यातील वाढत्या वीजदरांवर आणि 'MERC'च्या (महाराष्ट्र वीज नियामक आयोग) भूमिकेवर चिंता व्यक्त केली. रेट्रोस्पेक्टिव्हप्रमाणे (मागील प्रभावाने) ग्रीड चार्जेस का लावले जात आहेत आणि फीडरवर स्मार्ट मीटर का लावले जात नाहीत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले, "राज्यातील 100 टक्के फीडरवर स्मार्ट मीटर लावण्याचे काम आधीच पूर्ण झाले आहे. त्यामुळे आता कोणतीही 'अंदाजपंची' (अंदाजाने बिलिंग) चालत नाही."

फडणवीस यांनी इतर राज्यांची आकडेवारी देत स्पष्ट केले की, सध्या तामिळनाडू (₹९.३०), तेलंगणा (₹९.२०), मध्य प्रदेश (₹८.२७) या राज्यांपेक्षा महाराष्ट्राचे वीजदर (₹८.१९) कमी आहेत. सध्या केवळ गुजरातचे (₹७.८७) दर कमी आहेत. "सध्याच्या वाढीच्या कलानुसार भविष्यात हे दर ₹१४ असायला हवे होते, पण MERC ने ते ₹७.४३ निश्चित केले आहेत. त्यामुळे २०२९-३० मध्ये महाराष्ट्र सर्वात स्वस्त वीज देणारे राज्य असेल.“

सतेज पाटील आणि भाई जगताप यांनी टीओडी (Time of Day - ToD) टॅरिफमुळे सौर उद्योजकांचे कंबरडे मोडत असल्याचा आरोप केला. यावर फडणवीस यांनी स्पष्ट केले की, “सौर ऊर्जा उत्पादक दिवसा ३५% वीज वापरतात आणि रात्री ६५% वीज मागतात. जर आपण टीओडी टॅरिफ लागू केले नाही, तर याचा भुर्दंड राज्यातील ३ कोटी सामान्य ग्राहकांच्या खिशातून जाईल. केवळ ४० हजार लोकांच्या फायद्यासाठी आम्ही ३ कोटी सामान्य ग्राहकांचा तोटा होऊ देणार नाही.”

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २५ जून २०२६


## चमेली

अंगणातील चमेली
फुलांनी बहरली
सूर्यकिरणाच्या स्पर्शाने
आनंदाने मोहरली

चमेलीचे फुलं
आवडते सर्वांना
पूजा करतांना
वाहतात देवाला

दरवळणाऱ्या गंधाने
ताणतणाव होतो मुक्त
सुवासिक चमेली
अत्तरासाठी उपयुक्त

वाऱ्यासोबत नाचतांना
दावते भारी तोरा
सुगंधित करते
परीसर सारा

फुलांपासून गजरे
बनतात किती छान
त्वचा विकारासाठी
करी उपाय रामबाण




**रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## पावसाच्या थेंबाथेंबाने

रिमझिम पाऊस सखी,
अंगावर आपल्या पडले.
कितीतरी दिवसांनी,
मिलन आपले घडले.

पावसात भिजतांना,
श्वास तुझे माझे फुलले.
पावसाच्या थेंबाथेंबाने,
सौंदर्य चेहऱ्यावर खुलले.

नखशिखांत भिजतांना,
अंगावर शहारे गं आले.
सखी पहिल्या पावसात,
भिजण्याचे आनंद झाले.

तुझ्या साडीचा पदर,
हळुवार मंद भिरभिरते.
वेणीतून मोगऱ्याचा,
सुगंध खूप दरवळते.

पावसाचा थेंब थेंब,
हवाहवासा गं वाटला.
तुझ्या पदराचा स्पर्श,
मनात माझ्या साठला.




**नागेश बोंतेवाड,**
छत्रपती संभाजीनगर


## कै. सुमनबाई नानासाहेब भोसले यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप




**दाभाडी :** मौजे दाभाडी येथील स्व. नानासाहेब दिनकरराव भोसले सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने कै. श्रीमती सुमनबाई नानासाहेब भोसले यांच्या द्वितीय पुण्यस्मरणा निमित्त जिल्हा परिषद शाळा, दाभाडी येथे विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. पुण्यस्मरण दिनानिमित्त सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने जिल्हा परिषद शाळेत शुद्धलेखन व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व ६० विद्यार्थ्यांना वाचनालयाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रसंगी कै. श्रीमती सुमनबाई नानासाहेब भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती सदस्य श्री. मुक्तार शहा, दाभाडीच्या सरपंच सौ. अखिला बी. मुक्तार शहा तसेच गावातील मान्यवर उपस्थित होते. बक्षीस वितरण समारंभप्रसंगी श्री. मुक्तार शहा यांनी आपल्या मनोगतातून स्व. नानासाहेब भोसले उर्फ आबा यांच्या सामाजिक कार्याच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच आबांच्या खांद्याला खांदा लावून सुमनबाई (अक्का) यांनी गावातील गरजू व विविध घटकांतील नागरिकांना केलेल्या सहकार्याचा उल्लेख केला. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनीही कै. सुमनबाई भोसले यांना श्रद्धांजली वाहिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथालय कर्मचारी मुनिरा शहा मॅडम, सहशिक्षिका सौ. सोनाली जाधव मॅडम व ग्रंथपाल संतोष देशमुख यांनी प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली परिश्रम घेतले.कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक सोमनाथ क्षीरसागर, अशोक गायकवाड, बाळू निकम, संतोष आदिक, शिवाजी आदिक, वंदना निकम, शशिकला आदिक, भारत विटेकर, विकास आदिक, सदाशिव लोखंडे आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. अतिश मेहेत्रे यांनी केले, तर प्रास्ताविक ग्रंथपाल संतोष देशमुख यांनी केले.

## आमदार रोहितदादा पवार यांचा २६ जून रोजी हिंगोली जिल्हा दौरा



**हिंगोली (गोपाल सातपुते) :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे महासचिव शेतकऱ्यांचे तारणहार युवानेते आमदार रोहितदादा पवार हे पंढरपूर शेतकरी कर्जमुक्ती अन्नत्याग आंदोलनानंतर पहिल्यांदा दिनांक २६ जून २०२६ शुक्रवार रोजी हिंगोली जिल्हा दौऱ्यावर येणार असून सकाळी ९:३० वाजता राष्ट्रवादी भवन हिंगोली येथे शेतकरी - शेतमजूरांसोबत संवाद साधणार आहेत. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष माजी सहकार मंत्री मा.जयप्रकाश दांडेगावकर हे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. शेतकरी - शेतमजूर संवाद बैठकीस हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी शेतमजूर आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा उपाध्यक्ष ॲड. रवि शिंदे, विधानसभा अध्यक्ष बंडू मुटकुळे, गणेशराव गडदे, माजी जि. प. उपाध्यक्ष मनीष आखरे, माधव कोरडे, युवक जिल्हाध्यक्ष सोनू चव्हाण, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष व्यंकटेश जोगदंड, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष आयुबभाई पठाण, तालुकाध्यक्ष डॉ. संतोष बोंढारे, धीरज काकडे, यशवंतराव देशमुख, गजानन गव्हाणे, शहराध्यक्ष मुजीब पठाण मोईन बागवान, ॲड. शेख मोहसिन, दिलीपराव राखोंडे, सिराजभाई कुरेशी, आनंदराव कदम, अभिजीत देशमुख, डॉ. वेदांत मरळे, प्रा. गजानन थोरात, युवक तालुकाध्यक्ष सुशील बोंढारे, शोएब सिद्दीकी, राजू बाभळे, सुनील मस्के, गणेशराव लेकुळे, प्रफुल पाईकराव, लक्ष्मण पोटे, सुदर्शन वायकोळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या हिंगोली जिल्हा कमिटीच्या वतीने करण्यात येते.

## १९ जून - केरळ मधील ग्रंथालय चळवळीचे जनक स्वर्गीय पी.एन. पणिक्कर यांच्या स्मरणार्थ 'राष्ट्रीय वाचन दिन' उत्साहात साजरा



**पाटोदा :** पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभागाच्यावतीने दिनांक १९ जून २०२६ रोजी स्वर्गीय पी. एन. पणिक्कर यांच्या स्मरणार्थ 'राष्ट्रीय वाचन दिन' मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी केरळ मधील ग्रंथालय चळवळीचे जनक स्वर्गीय पी. एन. पणिक्कर यांना अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्या वतीने अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अपेक्स इंग्लिश स्कुलचे अध्यक्ष आदरणीय हुसेनभाई मकरानी तसेच श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर गढी येथील प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते. व्यासपिठावर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे यांनी प्रास्ताविकामध्ये १९ जून हा दिवस केरळ मधील ग्रंथालय चळवळीचे जनक स्वर्गीय पी. एन. पणिक्कर यांच्या स्मरणार्थ 'राष्ट्रीय वाचन दिन' म्हणून संपूर्ण देशात साजरा केला जातो असे सांगितले. मुलांची शिक्षणामध्ये आवड निर्माण व्हावी हा या अभियाना मागचा उद्देश आहे असे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे हुसेनभाई मकरानी म्हणाले की, एखादे पुस्तक एखाद्याच्या आयुष्याला कलाटणी देऊ शकत तसेच एक पान एखाद्याचे आयुष्य बदलू शकतं असे मत मांडले. तर दुसरे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले की, पुस्तके मुलांना चांगले संस्कार देतात, पुस्तके युवकांना दिशा देतात आणि वृद्धांना आधार देतात'. अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे म्हणाले की, वाचनसंस्कृती ही आजच्या काळाची गरज आहे. एक चांगले पुस्तक १०० मित्रांप्रमाणे असते. म्हणून लहानपणीच वाचनाची गोडी लागली की आपोआप काही गुण आपल्या अंगी येऊ लागतात. तेव्हा 'रोज एक तरी पान वाचत चला' हा संदेश या कार्यक्रमाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न ग्रंथालय विभागाच्या वतीने केला गेला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बंडू लोखंडे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. वंदन जाधव यांनी मानले. या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक, शिक्षकेतरवृंद, विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २५ जून २०२६


## सर पावसाची

येता सर पावसाची मनी उमंग वाटे
बरसता सरी नभातूनी हर्ष मनी दाटे..

मेघ गरजतात वारे सुटतात
बुंद-बुंद थेंब अवनीला सजवतात...

ऋतूच हा हर्षाचा सृष्टीचा नवनिर्मितीचा
येता सर पावसाची गंधाळतो सुगंध मातीचा...

यावा पाऊस वेळेवर धरती ही भिजून जावी
सुटावा गारवा पाने-फुले ही वाऱ्यावर झुलावी...

वाट बघतो मेघराज आम्ही तुझ्या गरजण्याची
साद देतो बळीराजा गगनाला बरसण्याची...

पावसा-पावसा येऊन जा गरजून जा बरसून जा
दुबळ्या या बळीराजाला उमेद देऊन जा...



**- कु. स्नेहा मिरा संतोष खोडके**
सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय
गोषेगाव ता, भोकरदन जि, जालना

## नगर नाका ते दौलताबाद टी पॉईंट वरील धोकादायक खड्डे बुजवले



**दौलताबाद (जावेद अहमद) :** छत्रपती संभाजी नगर नाशिक महामार्गावरील नगर नाका ते दौलताबाद टी पॉइंट पर्यंत चौ पदरी महामार्ग बनवण्यासाठी मंजुरी मिळाली आहे अति महत्त्वाचा महामार्ग म्हणून ओळख असलेल्या ऐतिहासिक दौलताबाद व खुलताबाद, वेरूळ लेणी,शिर्डी,धुळे सोलापूर महामार्ग, समृद्धी महामार्गाला जोडणारा हा मार्ग असून दररोज शेकडो वाहने यावरून प्रवास करत असतातजवळपास२०० कोटी रुपयांचे काम होणार आहे काही दिवसांपासून रस्त्याच्या कडेला नाली, ड्रेनेज व रस्त्यावरुन खड्डे खदून केबल टाकण्याचे काम सुरू आहे पण सबंधित विभागाच्या वतीने कामे पूर्ण झाल्यानंतर खड्डे तसेच सोडून देण्यात आले होते या मुळे खड्ड्यात अनेक दुचाकी वाहने घसरून अपघाताचे प्रमाण वाढले आहेया दररोजच्या होणाऱ्या घटनेची दखल शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संतोष आमले यांनी दखल घेत संबधित विभागाच्या वतीने दि 24 जून रोजी रस्त्याच्या कडेला व रस्त्यावर असलेलं खड्डे बुजवून घेतले यामुळे होणारे रोजचे अपघात कमी होण्यास मदत होईलयावेळी शिवसेनेचे हरी अप्पा भंडारी, बाळासाहेब आमले,अनिकेत बुट्टे,सम्राट घारे आदी उपस्थित होते


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


## शिवसेना युवा नेते जवळा बाजार मा सरपंच फैसल पटेल यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**हिंगोली (गोपाल सातपुते) :** जवळा बाजार येथील ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा माजी समाजकल्याण सभापती मुनीर पटेल यांचे चिरंजीव फैसल भैय्या पटेल यांचा वाढदिवस विविध सामाजिक, राजकीय व शिवसैनिक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.माजी समाजकल्याण सभापती मुनीर पटेल यांनी अलीकडेच शिवसेना (शिंदे गट) पक्षात प्रवेश केल्याने जवळा बाजार परिसरातील शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. फैसल भैय्या पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमास जिल्हाभरातून शिवसैनिक, सामाजिक कार्यकर्ते, युवक व विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी श्रीराम बांगर यांच्या नेतृत्वाखालील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच जवळा बाजार येथील काही कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात प्रवेश करून फैसल भैय्या पटेल यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमास श्रीराम बांगर, गोविंद राखोंडे, गणेश भैय्या बांगर, राजूभाऊ चापके, शिवाआप्पा भालेराव, राम नागरे, गणेशराव घुगे, रिपब्लिकन सेनेचे युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे, व्यंकटेश कराळे, मच्छिंद्र सोळंके, राजाभाऊ मुसळे, राजाभाऊ सांगळे, प्रदीप गिरी महाराज, हाकिंग बागवान, आपरोज अली, अजिंक्य नागरे, प्रवेज पटेल, शिवदास दमाने, मुरलीधर अण्णा मुळे, बाबूदादा तरटे, डॉ. प्रवीण काळे, विलास आप्पा साखरे, अमदू पैलवान, भीमशक्ती जिल्हाध्यक्ष प्रमोद कुलदिपके, सामाजिक कार्यकर्ते पंडित सुरेश, सचिन नागरे, बाला पवार, गणपत कीर्तने, सत्यनारायण सोनी तसेच पोटा खुर्द येथील रामप्रसाद शेळके, मोहन दसरथे, लक्ष्मण ढेंबरे, केशव वाघमारे, दिगंबर जाधव, शामराव जाधव, दत्तराव पाटील यांच्यासह असंख्य मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी समाजकल्याण सभापती मुनीर पटेल यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते केक कापून वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नंदकिशोर बाहिती यांनी केले.फैसल भैय्या पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त विविध परिसरातील गावांमधून मित्रपरिवार, युवक व पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून शुभेच्छांचा वर्षाव केला. विशेषतः युवकांमध्ये वाढदिवसानिमित्त मोठा उत्साह दिसून आला.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २५ जून २०२६


## ग्रुप कमांडर ब्रिगेडिअर बारबरे यांच्या हस्ते अर्जुन पाचंगेचा सन्मान



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जवाहर नवोदय विद्यालय लातूर येथे चालु असलेल्या वार्षिक कॅंपमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागातील कॅडेट अर्जुन पाचंगे ची २६ जानेवारी २०२६ रोजी दिल्ली येथे प्रजासताक दिन परेडसाठी तसेच वायईपी कॅंपसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली होती त्याबदल अर्जुनचा यावेळी सत्कार छ.संभाजीनगरचे ग्रुप कमांडर ब्रिगेडिअर ए जी बारबरे यांच्या हस्ते पदक व प्रमाणपत्र देऊन छ .संभाजीनगरच्या ग्रुप कार्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.ब्रिगेडिअर बारबरे यांनी यावेळी कॅडेटसना मार्गदर्शन करताना युवकांमध्ये एनसीसीची स्थापना ज्या उदेश्याने केली आहे ते म्हणजे युवकांमध्ये अनुशासन, नेतृत्व, शिस्त, अथक परिश्रम, आत्मविश्वास याचे पालन करून देशाची सेवा करावी असे सांगितले.तसेच बी व सी प्रमाणपत्र पास होणाऱ्या कॅडेटसना एसएसबी सीडीएस ची परीक्षा देऊन सरळ अधिकारी होता येते तसेच सैन्यदल,पोलीस,बीएसएफ, सीआरपीएफ,रेल्वे अशा अनेक क्षेत्रात विशेष संधी एनसीसी प्राप्त करून देते.तसेच आज एनसीसी लातूर बटालियनच्या अंतर्गत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील कॅडेटसनी सलग दोन वर्ष दिल्ली येथे जाऊन एक अनोखी ओळख अर्जुन पाचंगे, वैभवी शेंडगे यांच्या माध्यमातुन ऑल इंडियाच्या फायरिंग,ड्रिल,खेळ, ऑबस्टिकल,थल सैनिक कॅंप, एक भारत श्रेष्ठ भारत अशा कॅंपमध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे तसेच या कॅडेटसना आदर्श मानुन एनसीसीचे नावलौकिक कमवावे असे या कॅंपदरम्यान आपल्या शिबीराच्या मार्गदर्शन प्रसंगी बारबरे यांनी व्यतित केले.या कार्यक्रमासाठी लातूर बटालिअन चे कर्नल संतोष नवगण,कर्नल वाय बी सिंग सर,सुभेदार मेजर शंभु सिंग कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले ४५० कॅडेटस ३५ पीआय स्टाफ कर्मचारी ,४५ शिक्षक, प्राध्यापक उपस्थित होते .या यशाबदल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे , उपाध्यक्ष अश्लेष मोरे सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ संजय अस्वले सर्व प्राध्यापक , कर्मच्याऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या .

## अधिवेशनातील ‘बदली मंत्री’ वाद : संसदीय परंपरा की घटनात्मक अधिकार?

विधानसभेच्या चालू अधिवेशनात प्रश्नोत्तरांचा तास संपताच विधानसभा अध्यक्षांनी केलेली एक घोषणा सध्या राजकीय आणि घटनात्मक वर्तुळात चांगलीच चर्चेत आली आहे.उपमुख्यमंत्री महोदयांक-डील विविध खात्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी अन्य मंत्र्यांवर सोपवण्यात आलेली जबाबदारी आणि त्यावर एका ज्येष्ठ आमदारांनी घेतलेला आक्षेप,यामुळे विधिमंडळाच्या पटलावर एक नवा वाद कळीचा ठरला आहे.हा वाद केवळ राजकीय चकमक नसून संसदीय लोकशाहीतील कार्यपद्धती आणि घटनात्मक तरतुदींच्या आकलनाचा एक रंजक अध्याय आहे.विरोधी पक्षाचे आमदारांनी या 'बदली मंत्री' व्यवस्थेवर घेतलेला आक्षेप संसदीय कामकाजाच्या गांभीर्याकडे अंगुलिनिर्देश करतो.अधिवेशनात जनतेच्या प्रश्नांना थेट संबंधित खात्याच्या मंत्र्यांनीच उत्तर देणे अधिक उत्तरदायी मानले जाते.मात्र,या गदारोळावर विधानसभा अध्यक्षांनी दिलेले उत्तर संविधानाच्या मूळ गाभ्याला स्पर्श करणारे आहे.अध्यक्षांनी स्पष्ट केले की,ही केवळ एक कार्यपद्धती आहे आणि संविधानानुसार कोणतेही मंत्री कोणत्याही खात्याचे उत्तर सभागृहात देऊ शकतात; कारण मंत्रिमंडळ हे 'सामूहिक जबाबदारीच्या' (Collective Responsibility) तत्त्वावर चालत असते.भारतीय राज्यघटनेच्या कलम 164(2) नुसार,राज्याचे मंत्रिमंडळ हे सामूहिकरित्या विधानसभेला जबाबदार असते.याचा अर्थ असा की,शासनाचा निर्णय किंवा उत्तर हे एखाद्या वैयक्तिक मंत्र्याचे नसून संपूर्ण सरकारचे असते. जेव्हा एखादा मंत्री सभागृहात उत्तर देतो,तेव्हा तो संपूर्ण मंत्रिमंडळाचे प्रतिनिधित्व करत असतो.त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या एका मंत्र्याच्या अनुपस्थितीत दुसऱ्या मंत्र्याने उत्तर देणे घटनाबाह्य ठरत नाही,तर तो याच सामूहिक जबाबदारीचा एक परिपाठ मानला जातो.अधिवेशनाचा काळ हा जनतेचे प्रश्न तडीस लावण्याचा काळ असतो.अशा वेळी खात्याच्या मूळ मंत्र्यांच्या अपरिहार्य अनुपस्थितीमुळे प्रश्न प्रलंबित राहण्यापेक्षा,दुसऱ्या मंत्र्याने उत्तर देऊन सभागृहाचे कामकाज गतिमान ठेवणे लोकहिताचे ठरते.विरोधी पक्षाने यावर जागरूकतेने आक्षेप घेणे आणि सत्तापीठाने त्याला घटनात्मक चौकटीत उत्तर देणे,हीच खऱ्या अर्थाने आपल्या संसदीय लोकशाहीची प्रगल्भता आणि सौंदर्य आहे.या कायदेविषयक आणि राजकीय घुसळणीतून शेवटी लोकशाहीचेच हात बळकट होत असतात,यात शंका नाही.

**विजय म्हस्के पाटील**
**मो. नं -9595401111**
**- छत्रपती संभाजीनगर शहर**

## नगर नाका ते दौलताबाद टी पॉईंट वरील धोकादायक खड्डे बुजवले



**दौलताबाद (जावेद अहमद) :** छत्रपती संभाजी नगर नाशिक महामार्गावरील नगर नाका ते दौलताबाद टी पॉइंट पर्यंत चौ पदरी महामार्ग बनवण्यासाठी मंजुरी मिळाली आहे अति महत्त्वाचा महामार्ग म्हणून ओळख असलेल्या ऐतिहासिक दौलताबाद व खुलताबाद, वेरूळ लेणी,शिर्डी,धुळे सोलापूर महामार्ग, समृद्धी महामार्गाला जोडणारा हा मार्ग असून दररोज शेकडो वाहने यावरून प्रवास करत असतातजवळपास२०० कोटी रुपयांचे काम होणार आहे काही दिवसांपासून रस्त्याच्या कडेला नाली, ड्रेनेज व रस्त्यावरुन खड्डे खदून केबल टाकण्याचे काम सुरू आहे पण सबंधित विभागाच्या वतीने कामे पूर्ण झाल्यांनतर खड्डे तसेच सोडून देण्यात आले होते या मुळे खड्यात अनेक दुचाकी वाहने घसरून अपघाताचे प्रमाण वाढले आहेया दररोजच्या होणाऱ्या घटनेची दखल शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संतोष आमले यांनी दखल घेत संबधित विभागाच्या वतीने दि 24 जून रोजी रस्त्याच्या कडेला व रस्त्यावर असलेलं खड्डे बुजवून घेतले यामुळे होणारे रोजचे अपघात कमी होण्यास मदत होईलयावेळी शिवसेनेचे हरी अप्पा भंडारी, बाळासाहेब आमले,अनिकेत बुट्टे,सम्राट घारे आदी उपस्थित होते

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ‘वर्षा’ निवासस्थानी आ. बसवराज पाटील यांची सदिच्छा भेट




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी धाराशिव, बिड, लातूर नवनिर्वाचित विधान परिषद आ.बसवराज पाटील यांनी सहकुटुंब सदिच्छा भेट घेतली. यावेळी नुकत्याच पार पडलेल्या विधान परिषद निवडणुकीतील विजयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा सत्कार करुन मन:पूर्वक आभार व्यक्त केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी नवनिर्वाचित विधान परिषद आ. बसवराज पाटील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी धाराशिव जिल्हा मध्यवर्ती बॅंक चेअरमन तथा मुरुम नगराध्यक्ष बापुराव पाटील (काका), जावई सचिन गुदगे, मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना उमरगा, लोहारा तालुका सह अध्यक्ष शरण पाटील, जावई सचिन गुदगे, सौ.संपदा शरण पाटील , स्मिता पाटील कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २५ जून २०२६


# सिझर न झालेल्या कविता - सम्यक संबुध्दांच्या तत्वांची कविता




कवी स्नेही डॉ सुनील पवार यांच्या कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे अस्सल वेदनेची ठणक आहे.कारण प्रचंड यातना सहन करून कळा ही जीवाची अवकळा घेऊन जाते आणि मगच वेदनेचा टाहो फुटतो.इथे कवीने मनाची अस्सल सल मुक्त व्यक्त केली आहे कारण कवितेसारखा दु:ख निचरा करणारं शस्त्र म्हणजे सिझर न करता शब्द जन्माला घालने.हा कवीच्या मनोज्ञ भावनेचा उदगार आहे.या कवितेचा आत्मा हा मातृह्दयाचा असल्याने ज्याचे जळते त्यालाच कळते.ही अस्सल कविता संयत मनोभूमिकेतून आली आहे.जसे, वेदनेला पंख फुटले म्हणजे उसण्या कळा अनू नये.लुतभरली कविता जन्माला येणे हे योग्य नाही.कवितेला खरं मायेचा पाझर आणि वेदनेचा पान्हा हा आपोआप सुटावा लागतो.खोटे आणि फुसके बारुद कवितेचा घात करतात.कविता खोटेपणाचा गहिवर आणत नाही.ती नाटकी होऊन जाते.म्हणून ते लिहितात."आयुष्य दु:खात विरघळताना कवितेसाठी देह अंथरावा प्रत्येकाचा काव्यप्रवास सिद्धार्थापासून सुरू होऊन तथागता जवळ थांबावा...म्हणून कवी असण्याचे मुखवटे फेक मित्रा!येऊ दे कविता सहज सिझर न झालेली" (पृ.१२४) ही सविनय प्रांजळ भावना तर,'बुद्धम् शरणम् गच्छामि'या विश्वव्यापी विचारधारेचा हा निर्धार आहे.इथल्या कुजकट रूढी परंपरा,भाकडकथेला मुठमाती दिली.तथागतांच्या सम्यक संबुध्दांच्या मध्यम मार्गाने चाललो म्हणूनचं प्रगती आहे.पंचशील अष्टांगमार्गनेया भूमीत बुध्दविचार पेरले म्हणूनचं हा विचारांचाबोधिवृक्ष मानवी विकाराला धाराला थारा देत नाही.या सम्यक विचारांना ही कविता उजागर करते.'बा भीमा' बाबांनी आभाळभरून संविधानाचं वरदान दिलं.जयंती पुर्ते,पंखात बळ दिलं,गारुडी खेळ करणारी,आज सारेच बथ्थड झाले आहेत रक्त खवळत नाही,गट-तट वाढले, तुझ्या मुळे त्यांच्या बंगल्यात झगमगाट आहे.सखेद खंत व्यक्त करते."प्रज्ञा-शील-करुणेची बांधल्या गेली तिरडीरीतीची दुरडी अन् भरल्या डोळ्यांच्या रिम बाबा"(पृ.४१)ही कविता अंतरंगाच्या खोल तळातून येते.कारण हा इथल्या व्यवस्थेच्या जोखडाचे कारुण्यरूदन आहे.कविता येते श्रवण सराखी,कवितेच्या ऋणाईतून उतराई होता येतं नाही कारण ती भावस्पर्शी स्पंदन आहे.हा मनमस्तिष्कांच्या मेंदूचा खूराक आहे.कवितेनं कवीच्या मनाचा मायाळू मळवट भरला मायेनं.म्हणून ही वेदनेची सल कवितेची श्रृंखला होऊन येते."कविते...तू येतेस सिझर न होता तेव्हा प्रतिभेला भरत येतं वेदनेचं गाठोडं तुझ्यापुढे सोडता येतं"(पृ.५१)या कवितेने समकालीन वास्तवाचे भान सजक केले आहे.आजची सर्वहारा वंचित घटकांची होणारी हेळसांड व होरपळ तर आहेच पण महापुरुषांच्या विवेकी नावाचा गैरवापर करुन संविधान तत्वांची पायमल्ली करुन ही नतदृष्ट अनभिज्ञ व्यवस्थेवर ही कविता भाष्य करते.'प्रार्थने'पासून झालेला प्रारंभ ही मानसिकचा गहिवर घेऊन मायेचं जगणं आणि कवीच्या उध्दार करते.बाकी सर्व ठिक आहे म्हणून मनाची समजूत घालत 'बुध्दाची करुणा पेरावी.नाहीत पावलोपावली 'जुगारी'सर्प मुंगूसाचा खेळ लाऊन बाजारबसवे आहेत.या इश्काच्या जाळ्यात गळा कापणारे आहेत.'कवितेच्या खांद्यावर' विश्वासाने मान टाकता येते.इथल्या बेइमानी माणसाने दगा देता आहेत.वाढता आहेत 'आत्महत्या' ही आता भंणग होतं चालली आहे.इथल्या भूमीची निष्ठा हे मिरगाचा पाऊस मनाची उभारी देतो.तसे मेंदू धुवावा म्हणतो म्हणून शब्दांची पालखी जीभेवर येते.'खंजीर' या या शब्दांच्या जंजिरीत हे षडयंत्र रचले तर रोजचे जगणे कवी मनस्वीते रेखाटतो.शहराची सामसूम हे एक कोरोनाचं विदारक चित्रण आहे.'नाती' आज पसार होते आहे.तर एक निस्सीम श्रद्धेय भावनेच सम्यक दर्शन 'विठ्ठल माझा तथागत' या कवितेच्या ओळी,"विठ्ठल तथागत एक, वर्णू वारीचा महिमा.रुप तुझे गौतम,दिसे विठ्ठलात"(पृ.३९)या कवितेने एक सृजनशील भावनेतून आजचे वास्तव मांडले आहे.या कवितेची सृजन समर्पक प्रस्तावना"येशू, बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज डॉ बाबासाहेब आंबेडकर ही मानवांच्या कल्यानाची प्रतीके असून त्यांच्यामध्ये सर्व संत व महापुरुष यांचा सारांश सामावला आहे.तथागत हाच विठ्ठल आणि विठ्ठल म्हणजेच तथागत हे कवी सुनील पवारांचे काव्यात्म सुत्र सर्व संस्कृती प्रवाहांना एकत्र करणारी आहे.म्हणून समाजाच्या सर्व मापदंडांना मानवतेच्या बांधणारी ही कविता आंबेडकरवादी प्रवाहाचे विस्तारीकरण करते.सर्वांना जोडून घेते.त्याच्या कवितेतील प्रत्येक शब्द हा सिझर न होता आलाय.(पृ.११.श्रीपाल सबनीस)अशीही फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांची बांधिलकी देऊन आणि सामाजिक वास्तवाचा धारदार निर्धार या कवितेचा मर्मग्राही अनुबंध आहे."प्रज्ञा-शिल करुणेचा अथांग सागर असते कविता.यशोधरेच्या डोळ्यातला गहिवर असते कविता "(पृ.८७)या विश्वात कुलवंत माता रमाईचे अधिष्ठान हे एक पुण्याई आहे.ती रमाई मातेची म्हणून माता रमाईची ऋणाई कवी शब्दात अक्षरमय करतो ती अशी,"रमाई गेली झाला इंद्रधनुष्य बेरंग कोटी-कोटीची माता सोडून गेली संग लागली निळाई रडू नाही माता अम्हा अजून आठवते बाबासाहेबांची रमा "(पृ.९९) म्हणून या कोटी कुळांचा उध्दार झाला.आपल्या स्नेहाळू भावनेचा मनोगतात कवी सुनील पवार म्हणतात "या जगात कवितेचे लेखन करून गरजांची पूर्तता करता येत नाही.या कटू अनुभावांनी मी कमालीचा दु:खी,कष्टी झालो.दुसरीकडे उपजत प्रतिभेच्या बळावर प्रखर प्रतिकूलतेतून संपादलेली गुणवत्ता असली तरी आयुष्याच्या आघाडीवर आजवर मी अपयशीच राहिलो आहे.या निमित्ताने सांगावे वाटते की,बाभळीचे पानं फाटलेलं नसतं, चिंचेचं पानं फाटलेलं नसतं.लहान पानं अबाधित राहतात.मात्र केळीच एवढं मोठं पान पण जागोजाग टाकलेलं असतं.वाऱ्याला अडवताना त्याला अपयश येत आणि ते चिरुन जातं.केळीच्या पानात माझी जीवन प्रतिमा दिसली आणि यातूनच प्रस्तूत 'सिझर न झालेल्या कविता 'हा संग्रह आकारास आला आहे."(पृ.१४)हे मनोज्ञ मनोगत मन व्याकूळ करून जाते.हुंदके, लोकशाही,भूक, गणित, भ्रमनिरास,कोण म्हणतो,उदास मैना या सामाजिक सृजनशील जाणीवेच्या कविता तर 'दु:खाचा तुडवून ऊर'..या उभ्या आयुष्यात उच्च विभूषित ज्ञानीवंत प्रज्ञावंत शीलवंत कुलवंत असताना इथल्या व्यवस्थेच्या जोखडाचा कवी संयत विद्रोही मनोभूमिकेतून मी या दु:खाच्याऊरावरबसून पुढचं पाऊल टाकतो आहे.हा युगांचा संगर आहे.या कवितेचा आत्मा "धम्मचक्रावानी फिरायच हाय रंदाही दिशाला चमकायचं हाय रंआसवासांची करून होळी केली साजरी जरी दिवाळीशिरी निखारी वाहिली मोळी तरी रिकामी राहीली होळी..तूला भरकटत जायचं नाय रंगतुला आतून पेटायचं हाय रं...(पृ.१२५)ही कविता निश्चित ध्येय धारानेची कविता आहे.ही निर्लेप निस्पृह नितळ पण मनाचा ठाव घेऊन ऐकूनच या समकालीन वास्तवाची प्रखर वास्तववादी जाणीव करून देणारी ही कविता आहे.कवी सुनील पवार यांच्या कविता ही धारदार निर्धाराने वाटचाल करण्याचे शिकवते.ही कविता आत्महत्या करणारा हा पुळकटा आहे.जगण्याची आणि निर्धाराची ध्येयासक्ती देणारी ही कविता आहे.या कवितेची पाठराखण ख्यातनाम कवी विचारवंत यशवंत मनोहर लिहितात "सुनील पवारांनी ही कविता जगातील बुद्ध नावाच्या अनन्य प्रकाशस्तंभाच्या पायथ्याशी बसूनच लिहिली आहे असेच मला वाटते.बुध्द होऊ इच्छिणाऱ्या कोणाचाही प्रवास सिद्धार्थ निर्मुलनाच प्रवास असतो.म्हणून ही कविता मला दु:खावर मात करणाऱ्या निर्धाराची कविता वाटते.सिझर न झालेली कविता मला यशोधरेच्या व्याकुळ डोळ्यांमधील अश्रूंसारखी अनिवार्य वाटते.ही दु:खाची मस्ती जिरवणारी आंबेडकरी मनाची कविता आहे.(ब्लर्ब)ही पाठराखण हा मोठा शुभसंकेत देऊन जाणारी कविता झाली आहे.अरविंद शेलार यांचे अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक समृद्ध आशय देणारे मुखपृष्ठ उघड्या डोळ्यांनी डोळ्यात बसून दु:खाची गंच्चाडी धरणारी ही कविता.परिस पब्लिकेशनचे अतिशय देखणी पुस्तक बांधणी.कवी स्नेही सन्मित्र हार्दिक शुभेच्छा.

**पुस्तक:-सिझर न झालेल्या कविता**
**कवी:-प्रा डॉ सुनील पवार**
**प्रकाशक:-परिस पब्लिकेशन,पुणे**
**मुखपृष्ठ:-अरविंद शेलारप्रथमावृती:-१२ एप्रिल २०२३किंमत:-रु १७०/पुस्तक**
**परिचय:- डॉ प्रभाकर शेळके जालना**
**संवाद:- ९९७५१३७३३७**



**- डॉ प्रभाकर शेळके**







महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २५ जून २०२६

# संघर्षातून घडलेला शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि समाजसेवक : डॉ. किशोर श्यामराव सूर्यवंशी कचरे यांची प्रेरणादायी यशोगाथा





महातपुरी (ता. गंगाखेड, जि. परभणी) या ग्रामीण भागातील एका सामान्य कुटुंबातून शिक्षणाची वाट धरलेला युवक आज हजारो विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक, गरिबांचा आधारवड आणि संशोधन क्षेत्रातील नावाजलेला अभ्यासक म्हणून ओळखला जातो. हे नाव म्हणजे डॉ. नामदेव वैजनाथ कचरे.संजय गांधी आश्रम शाळा, सुरळवाडी येथे प्राथमिक शिक्षण घेतलेल्या डॉ. कचरे यांनी संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड येथून पदवी शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे पदव्युत्तर शिक्षण आणि पीएच.डी. पूर्ण करत त्यांनी संशोधन क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. अनेक संशोधन पेपर, लेख, आर्टिकल्स प्रकाशित करत त्यांनी नुकतेच "स्थानिक हवामानाची स्थिती दर्शविणारे यंत्र" या विषयावरील पेटंट प्रकाशित करून संशोधन क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.आज ते संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव (जि. छत्रपती संभाजीनगर) येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. मात्र त्यांची ओळख केवळ शिक्षक किंवा संशोधक म्हणून मर्यादित नाही. गेल्या दशकभरात त्यांनी समाजसेवा, शिक्षण, आरोग्य आणि युवक सक्षमीकरणाच्या क्षेत्रात केलेले कार्य असामान्य आहे.रुग्णांसाठी देवदूत ठरलेले व्यक्तिमत्त्वगेल्या दहा वर्षांपासून संपूर्ण मराठवाड्यातून उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे येणाऱ्या गरजू रुग्णांसाठी डॉ. कचरे हे आशेचे केंद्र बनले आहेत. रुग्णांची हॉस्पिटलमध्ये पूर्वनोंदणी करणे, बेड उपलब्ध करून देणे, रक्तपेढ्यांमधून रक्त मिळवून देणे, रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांच्या निवास व भोजनाची व्यवस्था करणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांच्या बिलामध्ये सवलत मिळवून देण्यासाठी डॉक्टर आणि प्रशासनाशी समन्वय साधणे अशी अनेक कामे त्यांनी निस्वार्थपणे केली.अनेक वेळा रुग्णाला बेड नसल्याने उपचार नाकारले जात असताना त्यांनी संबंधित हॉस्पिटल प्रशासनाला रुग्णाची परिस्थिती समजावून सांगून त्याला दाखल करून घेण्यास मदत केली. त्यांच्या या कार्यामुळे शेकडो कुटुंबांना नवजीवन मिळाले आहे.कोरोना काळातील मानवतेचा चेहराकोरोना महामारीच्या भीषण काळात अनेकजण स्वतःच्या सुरक्षेसाठी घरात थांबले असताना डॉ. कचरे प्रत्यक्ष मैदानात उतरले. रुग्णांसाठी अन्न, बेड, औषधे आणि इतर आवश्यक सुविधांची व्यवस्था करत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली.कोरोनामुळे मृत्यू झालेल्या काही व्यक्तींच्या नातेवाईकांनीही पुढे येण्यास भीती बाळगली असताना, त्यांनी लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने त्या मृत व्यक्तींच्या अस्थी विसर्जनाची जबाबदारी स्वीकारून मानवतेचे अनोखे उदाहरण घालून दिले.विद्यार्थ्यांचा आधारवड मराठवाड्यातील ग्रामीण भागातून पोलीस भरती, सैन्य भरती, स्पर्धा परीक्षा, पीएसआय, बँकिंग आणि इतर स्पर्धात्मक परीक्षांसाठी छत्रपती संभाजीनगर येथे येणाऱ्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना राहण्याची, जेवणाची आणि आवश्यक मार्गदर्शनाची मदत त्यांनी सातत्याने केली आहे.अनेक विद्यार्थ्यांना अकादमी आणि कोचिंग संस्थांमध्ये फी सवलत मिळवून देण्यासाठी त्यांनी संचालकांशी समन्वय साधला. काही विद्यार्थ्यांचे काम एका दिवसात पूर्ण न झाल्यास त्यांना स्वतःच्या वसतिगृहात राहण्याची व जेवणाची व्यवस्था करून दिली. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ मिळाले.विद्यार्थी हक्कांसाठी लढणारा नेतृत्वगुणडॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी अनेक वेळा प्रशासनाशी संघर्ष केला. पीएच.डी. प्रवेश परीक्षेत विद्यार्थ्यांचे नुकसान करणाऱ्या निगेटिव्ह मार्किंग पद्धतीविरोधात त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. परिणामी विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय झाला आणि उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय वाढली.दुष्काळी परिस्थितीत परीक्षा शुल्क आणि वसतिगृह शुल्क माफीसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे अनेक विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला. परीक्षा, गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्र, स्थलांतर प्रमाणपत्र आणि इतर शैक्षणिक कामांसाठी त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.विद्यार्थी विकासासाठी अखंड प्रयत्नशिक्षण केवळ पुस्तकांपुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले. काव्य, निबंध, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा, बुद्धिबळ, क्रिकेट, बॅडमिंटन, खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, पोवाडे, गीतगायन, नाटक, एकांकिका, व्याख्यानमाला आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन यांसारख्या अनेक उपक्रमांचे आयोजन केले.रॅगिंगसारख्या नकारात्मक प्रवृत्तींपासून विद्यार्थ्यांना दूर ठेवून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम त्यांनी सातत्याने केले. नवीन विद्यार्थ्यांना योग्य दिशा देऊन शिक्षणाकडे केंद्रित राहण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.सामाजिक ऐक्याचा संदेशछत्रपती शिवाजी महाराज जयंती आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांचे आयोजन करून सर्व धर्म, जात आणि समाजातील युवक-युवतींना एकत्र आणण्याचे काम त्यांनी केले आहे.रक्तदान शिबिरे, मोफत आरोग्य तपासणी, नेत्रतपासणी, अन्नदान, सामूहिक विवाह सोहळ्यांना मदत, शैक्षणिक साहित्य वाटप अशा अनेक उपक्रमांमधून त्यांनी समाजातील वंचित घटकांसाठी हातभार लावला.विद्यापीठ परिसरातील ऐतिहासिक योगदानडॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी त्यांनी सातत्याने लावून धरली. या पाठपुराव्यामुळे या महत्त्वपूर्ण कार्यासाठी निधीची तरतूद झाली आणि ऐतिहासिक स्मारक उभारणीच्या प्रक्रियेला गती मिळाली.यशाचा खरा अर्थडॉ. नामदेव वैजनाथ कचरे यांची यशोगाथा ही केवळ एका व्यक्तीच्या शैक्षणिक यशाची कथा नाही; ती संघर्ष, समाजसेवा, संशोधन आणि मानवतेची प्रेरणादायी कहाणी आहे. स्वतःच्या प्रगतीसोबत समाजातील शेवटच्या घटकाला सोबत घेऊन पुढे जाण्याचा संदेश त्यांच्या कार्यातून मिळतो.आज अनेक विद्यार्थी त्यांना मार्गदर्शक मानतात, अनेक रुग्ण त्यांना देवदूत समजतात आणि समाजातील असंख्य लोक त्यांच्याकडे विश्वासाने पाहतात. ग्रामीण भागातून आलेल्या एका जिद्दी युवकाने शिक्षण, संशोधन आणि समाजसेवेच्या बळावर निर्माण केलेला हा आदर्श प्रवास नव्या पिढीसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरत आहे. *मुक्या जीवांची सेवा, समाजहिताची भावना आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा सुंदर संगम घडवत डॉ. नामदेव वैजनाथ कचरे यांनी स्वखर्चाने गावातील मोकाट जनावरांसाठी संगोपन केंद्र सुरू करून समाजासमोरील एक गंभीर समस्या सोडविण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. गावातील रस्ते, चौक आणि शेतशिवारात फिरणाऱ्या मोकाट जनावरांमुळे नागरिक, लहान मुले, ज्येष्ठ व्यक्ती तसेच शेतकरी बांधवांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता. अपघात, पिकांचे नुकसान आणि सार्वजनिक असुविधा यामुळे ग्रामस्थ चिंतेत होते. ही समस्या केवळ प्रशासनावर सोडून न देता डॉ. कचरे यांनी समाजाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्यभावनेतून पुढाकार घेत जनावरांसाठी सुरक्षित निवारा, चारा, पाणी आणि संगोपनाची व्यवस्था निर्माण केली. या उपक्रमामागे त्यांना आई-वडिलांचे संस्कार, मोठ्या बंधूंचे मार्गदर्शन, ग्रामदैवत आई अंबाबाई यांच्यावरील श्रद्धा आणि गुजरातच्या कनकेश्वरी मातांच्या सेवाभावी कार्याची प्रेरणा लाभली.'समाजाने आपल्याला घडविले आहे, त्यामुळे समाजाला काहीतरी परत देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे' या भावनेतून सुरू झालेला हा उपक्रम केवळ मुक्या जनावरांच्या संरक्षणापुरता मर्यादित नसून गावातील सामाजिक ऐक्य, शेतकऱ्यांचे हित, नागरिकांची सुरक्षितता आणि समाजसुधारणेचा व्यापक संदेश देणारा आहे. स्वतःचा वेळ, श्रम आणि पैसा खर्च करून डॉ. कचरे यांनी उभारलेले हे संगोपन केंद्र संवेदनशील समाजनिर्मितीचे प्रेरणादायी उदाहरण ठरत असून, त्यांच्या या कार्यामुळे गावाला सुरक्षितता, शेतकऱ्यांना दिलासा आणि मुक्या जीवांना जीवनाचा आधार मिळाला आहे. या कार्यासाठी तसेच गावातील सुजाण आणि उदारमतवादी व्यक्तींची खूप मदत झाली.*



**डॉ. किशोर श्यामराव सूर्यवंशी एम ए राज्यशास्त्र (पीएचडी) एम ए इतिहास, मानसशास्त्र, पोस्ट डॉक व नेशनल फुल ब्राइट ( वरिष्ठ संशोधक), बी एम सी जे. सीपी.टी. सी. इत्यादी.**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २५ जून २०२६

# राजर्षी शाहू महाराज : सामाजिक समतेचा क्रांतीसूर्य - डॉ. राजेंद्र बगाटे



महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि लोककल्याणकारी इतिहासात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे स्थान अत्यंत मानाचे आणि अद्वितीय आहे. भारतीय समाजात सामाजिक न्याय, समता, शिक्षणाचा प्रसार आणि दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणाचा विचार प्रत्यक्ष शासनकारभाराच्या माध्यमातून यशस्वीपणे राबविणारे ते पहिले लोकाभिमुख राजे म्हणून ओळखले जातात. एकीकडे भारतावर ब्रिटिश सत्ता होती, तर दुसरीकडे भारतीय समाज जातिभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, निरक्षरता आणि आर्थिक विषमता यांसारख्या अनेक समस्यांनी ग्रासलेला होता. अशा काळात कोल्हापूर संस्थानच्या गादीवर आरूढ झालेल्या शाहू महाराजांनी केवळ एक राजा म्हणून राज्यकारभार केला नाही, तर समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. म्हणूनच त्यांना 'राजर्षी' या उपाधीने गौरविण्यात आले आणि सामाजिक न्यायाच्या इतिहासात त्यांचे नाव अजरामर झाले.२६ जून १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात यशवंतराव जयसिंगराव घाटगे यांचा जन्म झाला. पुढे कोल्हापूर संस्थानच्या दत्तक विधी नंतर त्यांचे नाव शाहू छत्रपती ठेवण्यात आले. त्यांचे बालपण राजघराण्यात गेले असले, तरी त्यांच्या मनात सामान्य जनतेविषयी असलेली आस्था आणि सामाजिक प्रश्नांविषयीची संवेदनशीलता लहानपणापासूनच दिसून येत होती. त्यांचे शिक्षण राजकोटमध्ये झाले. शिक्षणादरम्यान त्यांनी आधुनिक विचार, लोकशाही मूल्ये, प्रशासनशास्त्र आणि सामाजिक वास्तव यांचा अभ्यास केला. भारतातील बहुजन समाजाची दयनीय अवस्था, शिक्षणापासून वंचित राहिलेली जनता, अस्पृश्यतेच्या विळख्यात अडकलेले लाखो लोक आणि स्त्रियांची दुय्यम स्थिती यांचे वास्तव त्यांनी जवळून अनुभवले. याच अनुभवांनी त्यांच्या मनात सामाजिक परिवर्तनाचा दृढ संकल्प निर्माण केला.१८९४ मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानचा कारभार हाती घेतला. त्या काळात बहुजन समाजाला शिक्षण, नोकरी, सामाजिक प्रतिष्ठा आणि राजकीय सहभाग यांपासून दूर ठेवले जात होते. प्रशासनात काही विशिष्ट वर्गाचे वर्चस्व होते. जातिव्यवस्थेच्या नावाखाली समाजात अन्याय आणि विषमता रुजली होती. अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी राज्यकारभाराचा केंद्रबिंदू 'रयतेचे कल्याण' हा ठेवला. त्यांना वाटत होते की राज्यकर्त्यांचे कर्तव्य केवळ कर गोळा करणे किंवा कायदा-सुव्यवस्था राखणे एवढेच नसून समाजातील दुर्बल घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, हा विचार शाहू महाराजांच्या संपूर्ण कार्यामागे दिसून येतो. शिक्षणाशिवाय समाजातील विषमता दूर होऊ शकत नाही, हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे त्यांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी व्यापक धोरण स्वीकारले. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी विविध वसतिगृहे सुरू करण्यात आली. मराठा, जैन, मुस्लिम, लिंगायत, दलित आणि इतर समाजघटकांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची व्यवस्था करण्यात आली. गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी अनेक शाळा सुरू करण्यात आल्या. शिक्षण हा मोजक्या लोकांचा विशेषाधिकार नसून प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे, अशी त्यांची धारणा होती.सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात शाहू महाराजांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे आरक्षणाची अंमलबजावणी होय. २६ जुलै १९०२ रोजी त्यांनी मागासवर्गीय समाजासाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण जाहीर केले. हा निर्णय भारतीय इतिहासातील सामाजिक न्यायाच्या चळवळीतील मैलाचा दगड मानला जातो. समाजातील काही घटक शतकानुशतके शिक्षण आणि रोजगाराच्या संधींपासून वंचित राहिले होते. त्यामुळे त्यांना समान संधी मिळण्यासाठी विशेष उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे शाहू महाराजांचे मत होते. आज भारतीय राज्यघटनेत समाविष्ट असलेल्या आरक्षणाच्या तत्त्वाचा पाया त्यांच्या या निर्णयात दिसून येतो. म्हणूनच त्यांना सामाजिक न्यायाचे जनक असेही संबोधले जाते.अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अस्पृश्यतेमुळे समाजातील लाखो लोकांना मानवी सन्मानापासून वंचित ठेवले जात होते. शाहू महाराजांनी या अमानुष प्रथेला कठोर विरोध केला. सार्वजनिक विहिरी, तलाव, धर्मशाळा, शाळा आणि सरकारी कार्यालये सर्वांसाठी खुली करण्यात आली. दलित समाजातील लोकांना शिक्षण, नोकरी आणि सामाजिक जीवनात समान संधी मिळाव्यात यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या मते मनुष्याची किंमत त्याच्या जन्मावर नव्हे, तर त्याच्या गुणांवर आणि कर्तृत्वावर ठरली पाहिजे. त्यामुळे त्यांनी जातीय श्रेष्ठत्वाच्या संकल्पनेला स्पष्टपणे नाकारले.शाहू महाराजांनी १९१७ मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्या काळात असा निर्णय घेणे अत्यंत धाडसी होते. यामुळे गरीब आणि मागास कुटुंबांतील मुलांनाही शिक्षणाची दारे खुली झाली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजात आत्मविश्वास, स्वाभिमान आणि प्रगतीची प्रेरणा निर्माण होईल, असा त्यांचा विश्वास होता. आज शिक्षणाचा अधिकार हा ज्या प्रकारे लोकशाही व्यवस्थेचा अविभाज्य भाग मानला जातो, त्याची पायाभरणी शाहू महाराजांच्या अशा दूरदर्शी निर्णयांतून झालेली दिसते.स्त्री शिक्षण आणि स्त्रीसक्षमीकरण हे शाहू महाराजांच्या कार्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. त्या काळात स्त्रियांना शिक्षण देणे समाजातील अनेकांना मान्य नव्हते. स्त्रियांना घराच्या चौकटीतच मर्यादित ठेवण्याची मानसिकता प्रबळ होती. परंतु शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. मुलींसाठी शाळा सुरू केल्या, त्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले आणि स्त्री शिक्षणाबाबत समाजात जागृती निर्माण केली. शिक्षित स्त्री ही कुटुंब आणि समाजाच्या विकासाची गुरुकिल्ली आहे, असे ते मानत. त्यांनी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले, स्त्रियांवरील अन्यायकारक प्रथांना विरोध केला आणि महिलांच्या सन्मानासाठी विविध उपाययोजना राबवल्या.महात्मा जोतिराव फुले यांच्या विचारांचा शाहू महाराजांवर खोल प्रभाव होता. फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक चळवळीला त्यांनी सक्रिय पाठिंबा दिला. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी, स्त्रियांच्या उन्नतीसाठी आणि सामाजिक समतेसाठी फुले यांनी जो संघर्ष केला, त्याला शाहू महाराजांनी प्रशासनाच्या माध्यमातून बळ दिले. त्यांनी सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले आणि सामाजिक सुधारणांच्या कार्यासाठी आवश्यक पाठबळ उपलब्ध करून दिले. त्यामुळे महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळीला नवी ऊर्जा मिळाली.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याला प्रारंभीच्या काळात पाठबळ देणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तींमध्ये शाहू महाराजांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाची क्षमता आणि त्यांचे सामाजिक भान शाहू महाराजांनी ओळखले होते. त्यांनी विविध प्रसंगी आंबेडकरांना प्रोत्साहन दिले आणि दलित समाजाच्या प्रश्नांवर त्यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला. १९२० मध्ये माणगाव येथे झालेल्या परिषदेत शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांविषयी व्यक्त केलेले गौरवोद्गार आजही प्रसिद्ध आहेत. सामाजिक न्यायाच्या लढ्यातील ही ऐतिहासिक मैत्री भारतीय इतिहासातील एक प्रेरणादायी घटना आहे.शेतकरी आणि ग्रामीण विकासासाठी शाहू महाराजांनी अनेक महत्त्वपूर्ण उपाययोजना केल्या. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा होणे आवश्यक आहे, याची त्यांना जाणीव होती. त्यांनी सिंचन व्यवस्था विकसित केली, जलसंधारणाच्या योजना राबवल्या आणि कृषी विकासासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात आली. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी त्यांनी सहकाराच्या तत्त्वालाही प्रोत्साहन दिले.कामगार कल्याणाच्या क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. औद्योगिक विकासासोबत कामगारांच्या हक्कांचे संरक्षण झाले पाहिजे, असे ते मानत. कामगारांना योग्य वेतन, सुरक्षित कामाचे वातावरण आणि मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी त्यांनी विविध उपाययोजना केल्या. समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासाला समान महत्त्व देणे हीच खरी लोककल्याणकारी शासनव्यवस्था आहे, असा त्यांचा दृष्टिकोन होता.धार्मिक क्षेत्रात शाहू महाराजांचा दृष्टिकोन अत्यंत उदार आणि मानवतावादी होता. त्यांनी धर्माचा वापर समाजकल्याणासाठी व्हावा, अशी भूमिका घेतली. धर्माच्या नावाखाली होणाऱ्या भेदभावाला त्यांनी विरोध केला. सर्व धर्मांचा आदर राखत त्यांनी सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने मानवता ही कोणत्याही धर्मापेक्षा श्रेष्ठ होती.सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान दिले. साहित्य, संगीत, नाटक, लोककला आणि चित्रकला यांना त्यांनी सक्रिय प्रोत्साहन दिले. कलाकारांना आश्रय आणि आर्थिक मदत देऊन त्यांनी सांस्कृतिक विकासाला चालना दिली. कोल्हापूर हे सांस्कृतिक चळवळींचे महत्त्वाचे केंद्र बनले. समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी संस्कृतीचे जतन आणि संवर्धन आवश्यक आहे, असे ते मानत.क्रीडा क्षेत्रात त्यांनी विशेषतः कुस्तीला दिलेले प्रोत्साहन उल्लेखनीय आहे. कोल्हापूरची कुस्ती परंपरा देशभर प्रसिद्ध होण्यामागे शाहू महाराजांचे मोठे योगदान आहे. त्यांनी आखाड्यांची उभारणी केली, पैलवानांना प्रोत्साहन दिले आणि क्रीडा संस्कृतीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. खेळांमुळे युवकांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि आरोग्यदायी जीवनशैली विकसित होते, असा त्यांचा विश्वास होता.प्रशासनाच्या क्षेत्रात शाहू महाराजांनी लोकाभिमुख शासनाचा आदर्श निर्माण केला. ते थेट जनतेशी संवाद साधत असत. सामान्य माणसांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यावर त्यांचा भर असे. प्रशासनातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व यांना त्यांनी प्राधान्य दिले. त्यांच्या कारकिर्दीत कोल्हापूर संस्थान हे लोककल्याणकारी शासनाचे आदर्श उदाहरण बनले.शाहू महाराजांचा स्वभाव अत्यंत साधा, विनम्र आणि संवेदनशील होता. राजेपद असूनही त्यांच्यात कोणताही अहंकार नव्हता. गरीब, शेतकरी, कामगार, दलित आणि वंचित समाजघटकांच्या दुःखाविषयी त्यांना प्रचंड कळकळ होती. त्यांनी राजसत्तेचा उपयोग स्वतःच्या वैभवासाठी न करता लोकांच्या उन्नतीसाठी केला. त्यामुळेच जनतेच्या मनात त्यांच्याविषयी अपार आदर निर्माण झाला आणि त्यांना 'राजर्षी' ही उपाधी प्राप्त झाली.६ मे १९२२ रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक न्यायाच्या चळवळीतील एक तेजस्वी पर्व संपले; परंतु त्यांच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाला दिशा देत आहे. शिक्षण, समता, सामाजिक न्याय, स्त्रीसक्षमीकरण आणि लोककल्याणकारी शासन या क्षेत्रांतील त्यांचे योगदान आजही प्रेरणादायी आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात त्यांच्या कार्याचा प्रभाव जाणवतो.आजच्या काळात राजर्षी शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वपूर्ण वाटतात. विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासाच्या युगातही सामाजिक विषमता, शैक्षणिक असमानता आणि संधींचे असमान वितरण या समस्या कायम आहेत. अशा परिस्थितीत समाजातील वंचित घटकांना सक्षम करण्यासाठी शिक्षण, आरक्षण आणि सामाजिक न्यायाच्या धोरणांची आवश्यकता अधिक अधोरेखित होते. शाहू महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी मांडलेले विचार आजही मार्गदर्शक ठरतात.राजर्षी शाहू महाराज हे केवळ एका संस्थानचे अधिपती नव्हते, तर ते आधुनिक भारतातील सामाजिक लोकशाहीचे अग्रदूत होते. त्यांनी समतेवर आधारित समाजव्यवस्थेचे स्वप्न पाहिले आणि ते प्रत्यक्षात आणण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांचे जीवन आपल्याला शिकवते की सत्ता ही लोकांच्या कल्याणासाठी वापरली गेली तरच तिचे खरे मूल्य सिद्ध होते. त्यांच्या कार्यामुळे लाखो वंचित लोकांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण झाला.दि. २६ जून रोजी त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे सामाजिक न्याय, समता आणि मानवतेच्या मूल्यांचा पुनरुच्चार करणे होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, शिक्षण आणि विकासाच्या संधी सर्वांना समानपणे मिळाल्या पाहिजेत आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव स्वीकारला जाऊ नये, हा संदेश शाहू महाराजांच्या जीवनातून मिळतो. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण समतामूलक, न्याय्य आणि सर्वसमावेशक समाजनिर्मितीचा संकल्प केला, तर तीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात राजर्षी शाहू महाराज हे सदैव तेजस्वी दीपस्तंभ म्हणून स्मरणात राहतील आणि त्यांच्या विचारांची प्रेरणा पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शन करत राहील.



डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com